डोंबिवली वाहतूक उप विभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना

महाराष्ट्र पोलीस
ठाणे शहर

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in



जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ २०४ /२०२६ दिनांक:– २६/०९/२०२६

–: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :–

ज्याअर्थी, डोबिंवली वाहतुक उप विभागाच्या हददीत दत्तनगर बालमित्र मंडळ, डोंबिवली पुर्व यांचेतर्फे दिनांक १९/०९/२०२६ रोजी गणेशोत्सवा निमित्त सामूहिक **"गणपती अथर्वशीर्ष पठण"** कार्यक्रम आमदार श्री. राजेश मोरे यांचे कार्यालयासमोर, दत्तनगर, टंडन रोड, डोंबिवली पुर्व या ठिकाणी आयोजित करण्यात आलेला आहे. सदर कार्यक्रमात मोठया संख्येने भाविक सहभागी होणार असुन वाहतुक कोंडी होउन नागरीकांना त्रास होउ नये याकरीता दत्तनगर चौकाकडुन तसेच रामभाऊ म्हाळगी चौका कडे येणारी व रामभाऊ म्हाळगी चौकाकडुन दत्तनगर चौकाकडे जाणारी सर्व प्रकारची वाहतुक अन्य मार्गाने वळविण्यात येणार आहे. त्यामुळे सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

त्याअर्थी, मी **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

प्रवेश बंद – १) टंडन रोड वरील एस.के. पाटील चौक कडुन रामभाऊ म्हाळगी चौक मार्गे दत्तनगर चौकाकडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **म्हाळगी चौक/टीप टॉप कॉर्नर** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

पर्यायी मार्ग – सदरची सर्व वाहने डावे वळण घेवुन डॉ. राजेंद्रप्रसाद रोडने लेवा भवनगल्ली कट अथवा गिरणार चौक शिवमंदीर रोड मार्गे इच्छित स्थळी जातील.

प्रवेश बंद – २) नेरूरकर रोड वरील दत्तनगर चौकाकडुन टंडन रोड ने रामभाऊ म्हाळगी चौक/टीप टॉप कार्नर कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **दत्त चौक** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

पर्यायी मार्ग – सदरची सर्व वाहने नेरूरकर रोडवरील घोडा चौक मार्गे न्यु आयरे रोडने अथवा लेवा भवन गल्ली कट अथवा शिवमंदीर रोड मार्गे इच्छित स्थळी जातील.

सदर वाहतूक अधिसूचना दि.१९/०९/२०२६ रोजी सकाळी ०६:०० वा. ते दुपारी १३:०० वा. पावेतो अंमलात राहील.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

(पंकज शिरसाट)
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.

२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

प्रत माहितीसाठी सविनय सादर,

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे

प्रत कार्यवाहीस्तव,

मा. अपर पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग, कल्याण.

प्रादेशिक परिवहन अधिकारी, कल्याण.

पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–३, कल्याण.

पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, ठाणे.

परिवहन व्यवस्थापक, कल्याण–डोंबिवली महानगरपालीका, कल्याण

विभाग नियंत्रण कक्ष, राज्य परिवहन विभाग, कल्याण

नियंत्रण कक्ष, ठाणे/कल्याण शहर

प्रत :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे शाखा, ठाणे शहर

२/– सदर अधिसूचना नागरिकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्द होणेस विनंती आहे.

प्रत कार्यवाहीस्तव सविनय सादर,

मा. आयुक्त, कल्याण–डोंबिवली महानगरपालिका, कल्याण

प्रत :– समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे.

२/– सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

प्रत :– स.पो.आ. कल्याण वाहतूक विभाग/पोनि डोंबिवली, कोळशेवाडी, कल्याण वाहतूक उपविभाग.